महाराष्ट्र शासन

# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

जुने सचिवालय विस्तार इमारत, तळ मजला, जहांगीर आर्ट गॅलरीसमोर, एलफिस्टन कॉलेजच्या पाठीमागे, महात्मा गांधी मार्ग, मुंबई- ४०० ०३२
०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१० E-mail : mah-sforum@nic.in Website:- www.grahak.maharashtra.gov.in

जा.क्र.राआ/महा./PRO/ २०२४/ १४८५ दिनांकः- १२.०४.२०२४

## नोटीस

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,महाराष्ट्र, मुंबई या कार्यालयातील न्यायाधीशांना न्यायनिर्णय **(Judgment)** देण्याकरीता लघुलेखकांना श्रुतलेखन (Dictation) द्यावे लागते. राज्य आयोगातील लघुलेखकांची पदे रिक्त असल्याने न्यायनिर्णय **(Judgment)** देण्याकरीता प्रकरणे प्रलंबित रहात असल्याने मा अध्यक्ष व सदस्य यांना **Speech to Text Software** किंवा **Speech Recognition Software** प्रायोगिक तत्वावर उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे.

याकरीता **Speech to Text** किंवा **Speech Recognition** सॉफ्टवेअर ऑनलाईन किंवा ऑफलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्याकरीता पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तरी उपरोक्त सॉफ्टवेअर पुरवठा करणा-या पुरवठादारांनी दि. १९.०४.२०२४ रोजी पर्यत सर्व करांसहित दरपत्रक या कार्यालयास सादर करावे.

दरपत्रकामध्ये सदस्यता **(Subscription)** किती कालावधीकरीता आहे याचा स्पष्ट उल्लेख करावा.

सदस्यता **(Subscription)** नुतनीकरण ( **Renewal)** करण्यासाठी देखील दर नमुद करावा.

आर्थिक दर कार्यालयाकडून उघडण्याआधी सदर सॉफ्टवेअरचे प्रात्याक्षिक दाखविणे आवश्यक राहिल. प्रात्याक्षिकाची तारीख व वेळ कार्यालयाकडून कळविण्यात येईल.

सदरची नोटीस मा. अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, यांच्या पूर्व मान्यतेने प्रसिद्ध करण्यात येत आहे.

12/4/24

( विनय म. खोपटकर )
प्र. प्रबंधक (प्रशासन),
राज्य ग्राहक तक्रार निवारण
आयोग, महाराष्ट्र, मुंबई